पशुचिकित्सा

# उन्हाळ्यात जनावरांमध्ये आढळणारा मुतखडा आणि त्यावरील उपचार



**डॉ. मृणाली कांबळे**
**डॉ. मयूर काटे**
सहाय्यक प्राध्यापक,
पशुशल्यचिकित्साशास्त्र विभाग,
पशुवैद्यक महाविद्यालय, नागपूर



मुतखडा सर्व वयोगटातील जनावरांना होऊ शकतो. विविध प्रकारचे क्षार मूत्रमार्गामध्ये साठल्यामुळे जो खडा तयार होतो त्याला मुतखडा म्हणतात. हा खडा मूत्रमार्गातल्या कुठल्याही भागात तयार होतो. मुतखडा हा मुख्यत्वेकरुन मादीपेक्षा नरांमध्ये अधिक प्रमाणात आढळून येतो. नरांमध्ये असलेली मूत्रवाहक नलिकेची लांबी अधिक व नागमोडी रचना हे एक विशेष कारण असल्यामुळे मुतखड्याचे प्रमाण नरांमध्ये अधिक आढळून येते.

पशुधन ही भारतीय शेतकऱ्यांसाठी मोलाची संपत्ती असून त्यांची काळजी घेणे व त्यांना होणाऱ्या विविध आजारांपासून वाचविणे हे प्रत्येक पशुपालकाचे कर्तव्य आहे. जनावरांना विविध रोग होतात त्यावर उपचार केले की ते बरेही होतात. उन्हाळ्यात पाण्याची समस्या असल्यामुळे आणि तापमानामुळे जनावरांमध्ये मुतखडा होण्याचे प्रमाण जास्त असते. परंतु मुतखडा या रोगावर वेळीच उपचार केले नाही तर जनावर दगावू शकते.

मुतखडा सर्व वयोगटातील जनावरांना होऊ शकतो. विविध प्रकारचे क्षार मूत्रमार्गामध्ये साठल्यामुळे जो खडा तयार होतो त्याला मुतखडा म्हणतात. हा खडा मूत्रमार्गातल्या कुठल्याही भागात तयार होतो. मुतखडा हा मुख्यत्वेकरुन मादीपेक्षा नरांमध्ये अधिक प्रमाणात आढळून येतो. नरांमध्ये असलेली मूत्रवाहक नलिकेची लांबी अधिक व नागमोडी रचना हे एक विशेष कारण असल्यामुळे मुतखड्याचे प्रमाण नरांमध्ये अधिक आढळून येते. शेतकऱ्यांसाठी असलेली मौल्यवान संपत्ती म्हणजे बैल. पाण्याच्या कमतरतेमुळे उन्हाळ्यात बैलाला जर मुतखडा झाला व वेळीच उपचार न झाल्यामुळे त्याचा मृत्यू होतो व ऐन पावसाच्या तोंडावर शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होते. यामध्ये खच्चीकरण केलेल्या बैलांमध्ये टेस्टोस्टेरॉन या संप्रेरकाच्या अभावाने मुतखडा जास्त प्रमाणात आढळून येतो. वेळीच उपचार न केल्यास बैल दगावू शकतो.





**उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये जनावरांना सतत पिण्यासाठी पाणी मिळत राहील याची खबरदारी घेतली पाहिजे.**

## मुतखडा तयार होण्याची कारणे

१) शरीरातील पी.एच. किंवा सामूचे संतुलन बिघडणे. म्हणजे शरीराचा सामू जर जास्त असेल तर क्षार मूत्रमार्गात साठून मुतखडा तयार होतो.

२) 'अ' जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे मूत्रनलिकेची रचना बदलून त्यात मृत पेशी जमा होतात. क्षारांचा मृत पेशींवर थर साचतो व तेथे मुतखडा तयार होतो.

३) शरीरामध्ये पाण्याचे प्रमाण कमी झाले तर मुतखडा लवकर तयार होतो.

४) जास्त क्षारयुक्त किंवा खारट पाण्यामध्ये भरपूर प्रमाणात क्षार असतात. हे क्षार लघवीवाटे शरीराबाहेर टाकले जातात. जर ते मूत्रनलिकेत साचले तर तेथे मुतखडा लवकर तयार होतो.

५) मूत्रमार्गात जिवाणूंची बाधा झाल्यास मूत्रपिंड व मूत्राशयावर सूज येते व त्या भागातील पेशी मरतात. लघवीची आम्लता वाढते. लघवी तयार होण्याची प्रक्रिया व लघवीतील क्षारांच्या शोषण प्रमाणात बाधा निर्माण होऊन तेथे मुतखडा तयार होतो.

६) जनावरांच्या आहारात सतत बदल केल्यामुळे किंवा जास्त प्रमाणात कॅल्शियम व 'ड' जीवनसत्त्व असलेले खाद्य दिल्यामुळे मुतखडा तयार होतो. जनावरांमध्ये सल्फा या औषधाचा उपयोग वारंवार केल्यामुळे सुध्दा मुतखडा होण्याची शक्यता जास्त असते.

७) जनावरांना हिरव्या चाऱ्याच्या अभावामुळे सुध्दा मुतखडा होऊ शकतो.

**लक्षणे** : जनावरांना जर मुतखडा असेल तर खालीलप्रमाणे लक्षणे दिसून येतात.

१) मुतखडा मूत्रनलिकेत अडकला असेल तर लघवी करताना अडथळा निर्माण होऊन थेंबथेंब लघवी होते व लघवी करताना खूप त्रास होतो.

२) लघवीद्वारे रक्त बाहेर पडते.

३) जनावर लघवीसाठी कळा देते. जनावराची पोटशूळ उठते.

४) जनावर पोटास लाथा मारते.

५) जनावराचे पाणी पिणे व वैरण खाणे कमी होते.

६) जनावरांचे डोळे खोल जातात, ते अतिशय लाल किंवा पांढरे होतात.

७) तोंडाव्दारे लाळ गळणे, कातडी कडक होणे व शेणामध्ये म्यूकस, वास व कडक लेंड्या पडणे अशी लक्षणे दिसतात.

८) जास्त मूत्र साठल्याने व वेळीच लक्ष न दिल्यास लघवीची पिशवी फुटते व मूत्र पोटाच्या पोकळीच्या भागांमध्ये परसते. त्याला युरेमिया म्हणतात.

अशावेळी उपचार न केल्यास जनावराचा मृत्यू होऊ शकतो.

**निदान** : मूत्रनलिकेतून थेंबथेंब मूत्र बाहेर पडणे, मूत्राचा घाण वास येणे, पोट अपेक्षेपेक्षा जास्त फुगणे, योग्य निदान करण्यासाठी वेळीच पशुवैद्यकाकडे नेऊन रक्ताच्या तपासण्या 'क्ष' किरणाव्दारे करून खडा कुठे अडकला ते बघणे. पशुवैद्यकाच्या सहाय्याने






प्लास्टिकची पातळ/बारीक नळी मूत्रनलिकेमध्ये घालून ती सुरळीत जात नसेल तर खडा मूत्रनलिकेत अडकला असे समजावे.

१) **औषधोपचार** : मूत्रनलिकेव्दारे जर थेंबथेंब मूत्र बाहेर येत असेल तर पशुवैद्यकाच्या सल्ल्याने सिस्टोन गोळ्या खाऊ घातल्यास फायदा होतो. तसेच ४०-६० ग्रॅम सोडियम क्लोराईड चाऱ्यात मिसळून दररोज ४-५ दिवस द्यावे.

२) **शस्त्रक्रिया** : पशुवैद्याच्या सल्ल्याने मुतखड्यावर योग्य उपचार म्हणजे शरीरातील सामूचा समतोल बिघडला तर तो व्यवस्थित करावा. जनावराला भूल देऊन त्वरित मूत्रनलिकेतील मुतखडा शस्त्रक्रिया करुन बाहेर काढावा. ४ ते ५ दिवस सलाईन व औषधोपचार करावा. जर जनावराची मूत्रपिशवी फाटली असेल तर लवकरात लवकर शिवून घ्यावी. ही शस्त्रक्रिया अवघड असून वेळीच उपचार न केल्यास जनावर दगावण्याची संभावना असते.

### मुतखडा होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक उपाय

१) जनावराला भरपूर प्रमाणात स्वच्छ, गोडे पाणी पिण्यास द्यावे, खारट किंवा जास्त क्षारयुक्त पाणी देऊ नये. २) आठवड्यातून एकदा १०-२० ग्रॅम मीठ पिण्याच्या पाण्यातून पाजावे. ३) जनावरांच्या आहारामध्ये नेहमी हिरव्या चाऱ्याचा समावेश करावा. ४) सल्फा नावाच्या औषधाचा वापर कमी करावा. ५) रोजच्या आहारात क्षार मिश्रणाचा वापर करावा. ६) गोऱ्ह्याचे खच्चीकरण साधारणत: ३ वर्षांनी करावे. ■